# <u>अन्याय</u>

दिला जन्म दिले सोडूनी वाऱ्यावर
माझ्या कर्माला मात्र मी जबाबदार
तुला विठ्ठला मी नाही काही देत
तसेच नाही काही तुला मागत

युगे युगे आहेस तू तिष्ठत
जन्मोजन्मी आहे मीही फिरत
सारे सोडून म्हणे ये मला शरण
विटेवर मात्र घट्ट तुझे चरण

जरी आलो आहे मी तुला टाळत
ढुंकून तूही मला नाही पाहत
तुझाच अंश मी तू सांगतो गीतेत
मात्र मला दूर तू ठेवतो सतत

कृष्ण वा विठ्ठल होणे तुला शक्य
शक्य काहीच ना मला हा अन्याय

– नारायण
०९/०२/२३